नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/११/२०२६ (रविवार)

गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्यांविरूद्ध गुन्हा नोंद
१० गोवंश जनावरांची सुटका, कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन.एम. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ६ लाख १० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक ०१/११/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जुना पोलीस स्टेशन समोर कामठी रोडवर कन्हान येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच–४०/सि.एम–८४९१ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच–४०/सि.एम–८४९१ किंमती ५,००,०००/– रूपये आणि १० गोवंश जनावरे किंमती १,१०,०००/– रूपये असा एकुण किंमती ६,१०,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी १) बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच–४०/सि. एम–८४९१ चा चालक रोहीत ठवकर, वय २८ वर्ष, रा. टवेपार, ता. जि. भंडारा, २) विधीसंघर्षग्रस्त बालक

यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ११(१), (ड), (ई) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (ब), ९ महा. पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम ८३/१७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

मौदा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन मौदा हदद्ीतील सराईत आरोपी विशाल राजेंद्र उके, वय २७ वर्ष, रा. आंबेडकर नगर वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे.

नमुद सराईत गुन्हेगार याचेवर अवैधरीत्या दारू बाळगुन दारूची विक्री बाबत ०७ गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचेवर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हेगारी कृत्य सुरू ठेवल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार **विशाल राजेंद्र उके, वय २७ वर्ष, रा. आंबेडकर नगर वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर** यास **तीन** महिन्यांच्या कालावधीसाठी नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.



विशाल राजेंद्र उके

२०२२ पासून मिळून येत नसलेला पाहिजे आरोपीस अरोली पोलीसांनी घेतले ताब्यात

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात कारवाई करत पोलीस स्टेशन अरोली अप. क्र. ८८/२०२२ कलम ४५४, ४५७, ३८०, ४११ भादंवि या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी तुषार रत्नाकर डुंभरे, वय ३५ वर्षे, रा. खोकरला, ता. जि. भंडारा हा सदर गुन्हयात २०२२ पासून मिळून येत नसलेल्या पाहिजे आरोपीचा शोध घेतला आहे.

पोलीस स्टेशन अरोली येथील तपास पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी तुषार रत्नाकर डुंभरे, वय ३५ वर्षे, रा. खोकरला, ता. जि. भंडारा याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. आरोपी मिळून आल्यानंतर त्यास मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर आरोपीस जिल्हा मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे दाखल करण्यात आले आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ३३ गुन्हे दाखल,

दिनांक ३१/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ३३ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन देवलापार येथे ०८ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण १५९५० मिली देशी दारू, ३७ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ११,१२५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर